सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# नवनीत राणा भाजपात नाराज? बावनकुळेंनी दिले स्पष्टीकरण

## 'राणांचं पूर्ण जीवन भाजपसाठी असणार'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नागपूर –** भाजप नेत्या तथा अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा या पक्षात नाराज आहेत का, अशी चर्चा सध्या अमरावतीच्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अमरावती दौऱ्यादरम्यान नवनीत राणा कुठेही दिसून न आल्याने या चर्चांना आणखी उधाण आले. दरम्यान, नवनीत राणा यांच्या नाराजीच्या चर्चांवर पालकमंत्री बावनकुळे यांनी स्पष्टीकरण देत त्या पक्षात नाराज नसल्याचे स्पष्ट केले आहे.गेल्या काही दिवसांपासून नवनीत राणा भाजपमध्ये नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच बावनकुळे अमरावती शहराच्या दौऱ्यावर असताना राणा त्यांच्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित नसल्याने राजकीय चर्चांना बळ मिळाले. दुसरीकडे, नवनीत राणा यांनी सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या एका सूचक शायरीच्या व्हिडीओचीही राजकीय वर्तुळात चर्चा झाली. या व्हिडीओच्या माध्यमातून त्या नेमका कुणावर निशाणा साधत आहेत, असा सवाल उपस्थित केला जात होता.या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांना नवनीत राणा यांच्या कथित



नाराजीबाबत विचारणा करण्यात आली. त्यावेळी त्यांनी नवनीत राणा कोणत्याही प्रकारे नाराज नसल्याचे सांगितले. त्या भाजपच्या विचारांशी आणि पक्षाच्या भूमिकेशी एकनिष्ठ असल्याचा दावा बावनकुळे यांनी केला. तसेच राणांचे पूर्ण जीवन भाजपसाठी असणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.मात्र, बावनकुळे यांच्या या स्पष्टीकरणानंतरही अमरावतीच्या राजकीय वर्तुळातील चर्चांना पूर्णविराम मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राणा यांच्या अनुपस्थितीमागे नेमके कारण काय, पक्षांतर्गत राजकारणाचा त्याला संदर्भ आहे का, की त्यांच्या अनुपस्थितीचा राजकीय अर्थ काढला जात आहे, याबाबत विविध तर्क-वितर्क सुरू आहेत.दरम्यान, आगामी काळात नवनीत राणा आणि भाजपच्या स्थानिक नेतृत्वामध्ये सार्वजनिक कार्यक्रमांतील सहभाग आणि राजकीय समन्वय कसा राहतो, यावरून या चर्चांचे वास्तव कितपत आहे, हे स्पष्ट होण्याची शक्यता आहे. सध्या मात्र बावनकुळे यांनी राणांच्या नाराजीच्या चर्चांना ठामपणे नकार देत त्या भाजपसोबत एकनिष्ठ असल्याचे सांगितले आहे

# शिवसेना पक्ष-चिन्ह प्रकरणावर राहुल नार्वेकरांचा मोठा दावा

## 'सुप्रीम कोर्ट योग्य निर्णय देईल'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई–** एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत पडलेली उभी फूट आणि त्यानंतर 'मूळ पक्ष व धनुष्यबाण चिन्ह' यावर सुरू असलेला कायदेशीर लढा आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी बहुमताच्या आधारावर शिंदे गटाच्या बाजूने कौल दिल्यानंतर, उद्धव ठाकरे गटाने याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तिथे ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल जोरदार युक्तिवाद करत आहेत. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.



### 'माझा निर्णय कायद्याच्या चौकटीतच'

विधानसभा अध्यक्ष म्हणून आपण दिलेल्या निकालाचे नार्वेकरांनी समर्थन केले. मी जो काही निर्णय दिला आहे, तो अत्यंत शाश्वत आणि पूर्णपणे कायद्याच्या चौकटीत राहूनच दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व निकषांचे पालन करूनच तो निर्णय घेण्यात आला होता. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने यावर अधिक भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात केल्या जाणाऱ्या युक्तिवादावर भाष्य करताना नार्वेकर म्हणाले की, जे लोक निवडणूक आयोग किंवा माझ्या निर्णयाशी सहमत नाहीत, त्यांना न्यायालयात याचिका दाखल करण्याचा आणि तिथे युक्तिवाद करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मात्र, कोर्टात केवळ एका बाजूने युक्तिवाद झाला म्हणजे तोच कोर्टाचा अंतिम निकाल ठरत नाही. आता एका बाजूने युक्तिवाद झाला आहे, लवकरच दुसरी बाजूही आपले म्हणणे मांडेल. त्यानंतर सर्व तथ्ये आणि परिस्थिती तपासूनच सर्वोच्च न्यायालय आपला अंतिम निर्णय देईल.या कायदेशीर लढ्याबाबत बोलताना नार्वेकर पुढे म्हणाले की, विधीमंडळ सचिवालयाने या संपूर्ण प्रक्रियेत जे काही कामकाज केले आहे, त्याची सर्व सविस्तर माहिती आणि कागदपत्रे सर्वोच्च न्यायालयाकडे आधीच उपलब्ध आहेत. त्यामुळे दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर येणाऱ्या काळात न्यायालय यावर योग्य आणि कायदेशीर निर्णय देईल, याची मला निश्चित खात्री आहे.

# पृथ्वीराज चव्हाणांच्या वक्तव्याने सुप्रिया सुळे संतापल्या?

## म्हणाल्या – आम्हाला चुकीच्या चौकटीत बसवू नका

### काँग्रेस नेत्यांचा केंद्राशी समन्वय नसल्याचाही दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नाशिक**

महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांना खासदार सुप्रिया सुळे यांनी थेट प्रत्युत्तर दिले आहे. शरद पवार यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत जाऊ नये, असे आवाहन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केल्यानंतर सुळे यांनी काँग्रेसच्या महाराष्ट्रातील नेत्यांच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांचा केंद्रातील नेत्यांशी योग्य समन्वय नसल्यामुळे अशी विधाने होत असावीत, असा टोला सुप्रिया सुळे यांनी लगावला. त्यांच्या या वक्तव्यामुळे शरद पवारांच्या संभाव्य राजकीय भूमिकेवरून सुरू असलेल्या चर्चेला आता काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा नवा रंग मिळाला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत जाणार असल्याच्या चर्चांना गेल्या काही दिवसांत वेग आला आहे. शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीगाठी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप नेत्यांमधील वाढलेला संवाद यामुळे या चर्चांना आणखी बळ मिळाले. केंद्र सरकारच्या काही निर्णयांवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून घेतली




जाणारी तुलनेने मवाळ भूमिका याचाही राजकीय अर्थ काढला जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शरद पवारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीऐवजी इंडिया आघाडीसोबतच राहावे, असे आवाहन केले.

नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी शरद पवारांच्या राजकीय विचारांचा दाखला देत आपली भूमिका स्पष्ट केली. शरद पवार हे विचारांनी डावीकडे झुकलेले नेते असून फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांवर त्यांचा विश्वास आहे, असे चव्हाण म्हणाले. त्यामुळे मनुस्मृतीला मानणाऱ्या विचारसरणीच्या लोकांसोबत त्यांनी जाऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. शरद पवार आणि नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.–

# सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे

## गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळी हे सण गोड होण्याऐवजी कडू होणार

### साखरेचे दर १०–१२ दिवसांत १०० रुपयांवर जाणार; प्रकाश आंबेडकरांचा मोठा दावा,

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२ मुंबई –** येत्या १० ते १२ दिवसांत साखरेचे भाव प्रति किलो १०० रुपयांवर पोहोचतील, असा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. सरकारच्या चुकीच्या




धोरणांमुळे गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळी हे सण गोड होण्याऐवजी कडू होणार असून, या दरवाढीविरोधात जनतेने रस्त्यावर उतरून लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर धरणे आंदोलन केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी साखर दरवाढ आणि केंद्र सरकारवर टीका केली.

सरकारकडे कोणतेही ठोस नियोजन नसून फक्त नफा कमावणे हाच त्यांचा अजेंडा असल्याचा आरोप आंबेडकरांनी केला. मळी आणि रॉ शुगर इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आल्यामुळे देशात साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. भारताला आता दुप्पट किमतीने तब्बल १० मिलियन टन साखर आयात करावी लागण्याची परिस्थिती आहे.

शुगर माफियांनी साखरेचे भाव वाढवले असून ते आणखी वाढतील. मोदक आता गोड लागण्याऐवजी कडू लागतील, असा टोला त्यांनी लगावला. हे दर नियंत्रणात आणायचे असतील तर जनतेने आमदार, खासदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर तिरंगा घेऊन आंदोलन केले पाहिजे, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. ते म्हणाले, हे माफियांचे आणि हुकूमशाहीचे सरकार आहे. देशात लोकशाही संपली असून सत्ताधारी व पोलीस जनतेचे नोकर आहेत, हे त्यांनी विसरू नये. त्याचबरोबर काँग्रेसने राष्ट्रीय पक्ष म्हणून ठाम भूमिका घेण्याची ताकद दाखवावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

# पुण्यातील राडा हा काँग्रेसचा इव्हेंट, मुख्यमंत्री फडणवीसांचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई –** काँग्रेसचे नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा पुण्यामध्ये 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम शनिवारी (२२ ऑगस्ट) होणार आहे. पण या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी (२१ ऑगस्ट) पुण्यातील सीओईपी वसतीगृहात



भाजपची विद्यार्थी संघटना अभाविप आणि काँग्रेसचे युवक संघटन एनएसयुआय यांच्यामध्ये जोरदार वाद झाल्याचे समोर आले. यावरून आता विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये मोठा वाद रंगला आहे. आता शनिवारीच माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहेत.

माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील कार्यक्रमासाठी येणाऱ्या ९० ते ९५ टक्के मुली या काँग्रेस नेत्यांच्या महाविद्यालयातील आहेत. या मुलामुलींना तसेच सोशल मीडिया इन्फ्लुएंसरला पैसे देऊन बोलावले आहे. कार्यक्रमाचे फक्त सकारात्मक कंटेट टाका. नाही तर पैसे देणार नाही, असे या सोशल इन्फ्लूएंसरला सांगण्यात आले. असा मोठा दावा केला आहे. तसेच, भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ९० ते ९५ टक्के मुली या काँग्रेस नेत्यांच्या महाविद्यालयातील असून त्यांनाच या कार्यक्रमात प्रवेश मिळणार आहे. नवनाथ बन यांनी या कार्यक्रमाचा पर्दाफाश केला. असे म्हणत त्यांनी मोठी माहिती दिली.

इव्हेंट मॅनेजमेंटच्या माध्यमातून मुलींना राहुल गांधींच्या कार्यक्रमासाठी आणले जात आहे. हा एक इव्हेंट असून यासाठी सर्व घडवून आणले जात आहे. जसा एखादा सिनेमा प्रदर्शित होण्याआधी वाद निर्माण केला जातो. म्हणजे सिनेमा हिट होतो. तसा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या नेत्यांनी केला. पण पोलिसांनी त्यामध्ये लक्ष घातले आणि ते योग्य कारवाई करतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, पुण्यात झालेल्या या राड्यानंतर पोलिसांनी काही कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. प्रशासनाकडून जाणीवपूर्वक काँग्रेस आणि एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांना लक्ष्य करून दहशतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचा पलटवार काँग्रेस नेत्यांनी केला आहे.–

# तुम्हाला धमकावलं जाईल, घाबरवलं जाईल, पण...;

## काँग्रेस नेत्यांसोबत बैठक, पुण्यात राहुल गांधींकडून कानमंत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२पुणे :** काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज पुणे दौऱ्यावर असून ते महाराष्ट्रातील तरुणाईशी संवाद साधणार आहेत. छात्रों की गुंज या कार्यक्रमाच्या माध्यमातून ते झेन–जींना बोलतं करणार आहेत, त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. त्यासाठी, राहुल गांधींचे पुण्यात आगमन झाले असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांनी पुणे विमानतळावर त्यांचे स्वागत केले. त्यानंतर, राहुल गांधींनी राज्यातील प्रमुख काँग्रेस नेत्यांची बैठक घेत राज्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. राहुल गांधींनी बैठकीत सुरुवातीलाच पुण्यात काल विद्यार्थ्यांची जी घटना घडली त्याची संपूर्ण माहिती घेतली, काँग्रेस नेत्यांकडून याबाबत त्यांना सविस्तर



माहिती देण्यात आली. तसेच, तुम्हाला अशा प्रकारचं धमकावल जाईल... तुम्हाला घाबरवल जाईल... मात्र तुम्ही लढत रहा असे म्हणत राहुल गांधींनी काँग्रेस नेत्यांना कानमंत्र दिला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राहुल गांधींसोबतच्या बैठकीचा वृत्तांत सांगितला. राहुल गांधींसमवेत आमची बैठक झाली, काही सामाजिक आणि राज्यातल्या प्रश्नांवरती चर्चा झाली.ऋ तुम्हाला धमकवण्याचा घाबरण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जाऊ शकतो. मात्र, तुम्ही लढत रहा असं राहुल गांधींनी सांगितल्याचं वडेट्टीवार म्हणाले. भाजप हे लोकांच्या मनातून गेलेलं सरकार आहे, तांत्रिक सरकार उरलेलं आहे.ऋ राहुलजी कानमंत्र देत नाहीत, कानमंत्र हे भाजपची लोक देत असतात, ऋआमचा त्यावर विश्वास नाही असे वडेट्टीवारांनी म्हटले. तसेच, ऋराहुल गांधी हे विचार देत असतात आणि ते आम्हाला आज त्यांनी दिले, असेही वडेट्टीवारांनी म्हटले. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्याची ही वेळ नाही.ऋ आम्ही एवढे दिवस प्रयत्न करत होतो. मात्र, आता लोकांमध्ये त्या गोष्टी पोहोचायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे, त्याचा आनंद आहे. काँग्रेसमध्ये जी मरगळ म्हणत होती, ती दूर झालेली पाहायला मिळते असे अपक्ष खासदार आणि काँग्रेस समर्थक विशाल पाटील यांन म्हटले.

## संपादकीय ......

# आश्रमशाळांचा विलाप

*राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील दुरवस्था ही पाचवीला पूजलेली समस्या बनली आहे. दुर्गम, डोंगराळ, आदिवासीबहुल भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी या आश्रमशाळांची स्थापना करण्यात आली. जुन्या मुंबई राज्यात १९५३-५४ च्या सुमारास सर्वप्रथम आदिवासी आणि विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या मुलांसाठी आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. शासनाने १९७२-७३ पासून राज्यभरात मोठ्या प्रमाणावर आश्रमशाळा सुरू करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी केली. दुर्गम भागातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी घरापासून दूर जावे लागू नये आणि त्यांना राहण्या-खाण्याची मोफत सोय एकाच ठिकाणी मिळावी, या हेतूने शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांचे जाळे विणण्यात आले. सुरुवातीला या शाळा प्राथमिक स्तरावर होत्या. काळानुरूप त्यांचा विस्तार माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत केला गेला.*

*सध्या या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित स्वरूपात ५५६ आश्रमशाळा चालविल्या जातात. पैकी ३७ प्राथमिक म्हणजे इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत, तर ३१९ माध्यमिक म्हणजे १ ली ते १० वीपर्यंत आहेत. माध्यमिक आश्रमशाळांशी संलग्न २०० कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. यात सुमारे २ लाख ६१ हजार ८३६ विद्यार्थी शिकताहेत. त्यातील १ लाख ४० हजार २५४ मुले आणि १ लाख २१ हजार ५८२ मुली आहेत. या शाळांच्या व्यवस्थापनात आणि पायाभूत सुविधांतील त्रुटी, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि आरोग्याचे प्रश्न यामुळे येथील मुला-मुलींच्या सुरक्षिततेचा मुद्दा वेळोवेळी ऐरणीवर आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात जपतलाई येथील आश्रमशाळेत तीन चिमुकल्या मुलींचा सर्पदंशाने मृत्यू झाला. सरकारी यंत्रणेच्या अक्षम्य दुर्लक्षाचा आणि संवेदनहीनतेचा बळी म्हणून या चिमुकल्यांच्या मृत्यूकडे पाहिले पाहिजे. ज्या ठिकाणी समाजातील वंचित घटकातील मुले शिक्षणाची स्वप्ने पाहत सुरक्षित निवाऱ्याच्या आशेने येतात, त्याच ठिकाणी त्यांचा असा करुण अंत व्हावा, हे अत्यंत वेदनादायी आहे.*

*व्यवस्था किती पोकळ आहे, हे सांगण्यासाठी मृत मुलींच्या पालकांच्या डोळ्यांतील अश्रू पुरेसे आहेत. या आश्रमशाळांच्या परिसरात सापांची बिळे, विटांचे ढिगारे आणि सर्वत्र साचलेले सरपण असे चित्र दिसते. स्वच्छतेचा अभाव आणि परिसराची दुरवस्था यामुळे सापांना तिथे आश्रय मिळणे स्वाभाविक आहे. आश्रमशाळेत नियमांचे उल्लंघन करून प्रवेश दिले जात असल्याचे समोर आले आहे. कागदावर विद्यार्थी संख्या वाढवून सरकारी अनुदान लाटण्याचे प्रकारही घडले आहेत. मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ही आश्रमशाळा सरकारी अनुदान घेत असूनही शिक्षक, वॉर्डन तसेच इतर आवश्यक सुविधा पुरवत नसल्याचे नमूद केले होते. एका पाहणीनुसार, गेल्या दोन वर्षांत २२ प्रकल्पांमध्ये ४०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या २००२ ते २०१२ या दहा वर्षांत ७९३ आदिवासी विद्यार्थ्यांचा आश्रमशाळांमध्ये मृत्यू झाला होता. हे मृत्यू गंभीर आजार, अपघात, गळफास किंवा सर्पदंशामुळे होत आहेत.*

*निवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी बेडची शिफारस केलेली आहे; पण जवळपास ५० टक्के आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना जमिनीवरच झोपावे लागते. राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी वयाची अट निश्चित केली आहे. याचा फटका दुर्गम भागातून येणाऱ्या व शिक्षणात उशीर झालेल्या विद्यार्थ्यांना बसत आहे. तीव्र विरोधानंतर वयोमर्यादेत काही बदल केले, तरी या अटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण आहे. आर्थिक, कौटुंबिक किंवा आरोग्यविषयक कारणांमुळे ज्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही काळ खंड पडला, अशांना प्रवेश मिळण्यात अडचणी निर्माण करणाऱ्या कडक तरतुदी या निर्णयामध्ये आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही आंदोलन, सामाजिक-विद्यार्थी संघटनांच्या कार्यात सहभाग घेऊ नये, अशा अटी लादल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे. सलग तीन महिने ७० टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती असल्यास प्रवेश रद्द करण्याची तरतूद यात आहे. या पार्श्वभूमीवर केवळ मृत मुलींच्या पालकांना मदत देऊन किंवा आश्वासने देऊन किंवा एखादी आश्रमशाळा बंद करून हे प्रश्न सुटणार नाहीत.*

*सरकारला खरोखरच आदिवासी समाजाचा विकास साधायचा असेल, तर जमिनीवरील स्थिती सुधारायला हवी. आश्रमशाळांत स्वच्छ पाणी, उत्तम आरोग्य सुविधा आणि सुरक्षित वातावरण पुरवले पाहिजे. अनेक आश्रमशाळांनी दहावी-बारावी बोर्ड परीक्षांमध्ये सलग शंभर टक्के निकालाची परंपरा राखली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण परिस्थितीवर मात करत उच्च गुण मिळवलेत. डहाणू किंवा मेळघाट येथील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन आणि क्रीडा स्पर्धांमध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. सौरऊर्जेवरील छोटी यंत्रे बनवणे, शालेय स्तरावर वैज्ञानिक उपक्रमात येथील विद्यार्थ्यांनी ठसा उमटवला आहे. हजारो आदिवासी मुलामुलींना शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणण्यात आश्रमशाळांचे योगदान मोठे आहे. त्यामुळे गंभीर त्रुटी समोर आल्याने या शाळा बंद करणे हा पर्याय व्यवहार्य नाही. मे महिन्यात आदिवासी विकास विभागामार्फत स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या ५ प्राथमिक आश्रमशाळांचे माध्यमिक स्तरावर, तर १९ माध्यमिक आश्रमशाळांचे कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.*

*आवश्यक पदनिर्मिती आणि खर्चाची तरतूद करण्यासही मान्यता दिली. दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागू नये, हा यामागील उद्देश. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने अनेक आदिवासी कुटुंबांना मुलांच्या पुढील शिक्षणाचा खर्च आणि दूरच्या ठिकाणी राहण्याचा भार पेलत नाही. परिणामी, अनेक विद्यार्थी शिक्षण सोडतात. मुलींच्या शिक्षणावर याचा अधिक परिणाम होतो. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगानेही अनुदानित आश्रमशाळांना प्रोत्साहन देण्याची शिफारस केली आहे; मात्र शाळांचा दर्जा वाढवितानाच पात्र आणि पुरेसे शिक्षक, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक सुविधा, क्रीडा साधने, सुरक्षित वसतिगृह, स्वच्छतागृहे आणि पौष्टिक आहार अशा मूलभूत सुविधा सक्षम करणे आवश्यक आहे.*

# जिल्हा परिषद आता पेन्शन घोटाळा

## दिव्यांग कल्याण विभाग रडारवर : दोन कर्मचाऱ्यांवर टांगती तलवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

नियमबाह्य नियुक्तीच्या आधारे शासनाची फसवणूक करून ऐच्छिक सेवानिवृत्ती घेवून शासनाच्या पेन्शन योजनेचा लाभ काही मंडळी घेत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जिल्हापरिषदेच्या दिव्यांग कल्याण विभागाकडून या घोटाळ्याला हवा दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात भारतीय जनता पक्ष अनुसुचित जाती मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस प्रा. उद्धव पारवे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. मात्र तक्रारीच्या अनुषंगाने कुठलीही कार्यवाही होत नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त करित प्रशासनाला आणखी एक स्मरणपत्र दिले आहे. वर्धा येथील एका संस्थेव्दारे तिवसा तालुक्यात निवासी मूकबधीर विद्यालय चालविण्यात येते. यामध्ये दोन व्यक्तींनी खोट्या दस्तावेजाच्या साह्याने बनावट नियुक्तीपत्र देत शासनाची




फसवणूक केली. विशेष म्हणजे बोगस कागदपत्रांच्या आधारे चार कर्मचाऱ्यांना पेन्शनकरिता पात्र ठरिवण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यापैकी दोन जणांची नेमणूक प्रत्यक्षात तिवसा तालुक्यातील त्या मुकबधीर मतीमंद शाळेवर १९९८ पासून दाखविण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक पात्रता व अर्हता प्रमाणपत्र देण्यात आले. जिल्हापरिषदेच्या दिव्यांग कल्याण विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रकरणाशी थेट संबंध असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या बाबत २४ जुलै रोजी सीईओंना तक्रार देण्यात आली असली तरी अद्यापही संबंधितांची कुठल्याही प्रकारे चौकशी झालेली नाही. या बनावट पेन्शन प्रकरणात दिव्यांग कल्याण विभागात अनेक वर्षे ठाण मांडूण बसलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> या प्रकरणात तक्रारकर्त्यांनी माझ्यावर आरोप केले असून ते बिनबुडाचे आहेत. हा घोटाळा माझ्या कार्यकाळात झालेला नाही. चौकशी अधिकारी म्हणून काम पाहण्यास आपण नकार दिला आहे. पारदर्शकपणे या प्रकरणाची चौकशी व्हावी म्हणून मी चौकशीपासून दूर आहे.
>
> **- पुरुषोत्तम शिंदे,** दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद.

### दिव्यांग कल्याण विभागाकडे दुर्लक्ष

जिल्हापरिषदेच्या दिव्यांग कल्याण विभागाकडे प्रशासनाकडून डोळेझाक होत असल्याचा आरोप जिप वर्तुळात होत आहे. या विभागातील अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच टेबलवर ठाण मांडून बसेल असून आश्रमशाळा, दिव्यांग निवासी शाळांची तपासणी, अंतर्गत चौकशी, अशी महत्वाची कामे या विभागाची असल्याने येथील अनेक कर्मचारी बदल्याच करण्यास उत्सुक नसल्याचा आरोप केला जात आहे.

# कृषीच्या नव्या आकृतीबंधास स्थगिती

## सहा संघटनांचा आंदोलनाचा इशाऱ्यानंतर घोषणा, अंतर्गत बदलही करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती-** कृषी विभागाच्या नविन आकृती बंधास स्थगिती देण्यात आली असून यामध्ये बदल करण्यात येणार आहेत. राज्यातील सहा संघटनांनी या नव्या आकृती बंधास विरोध केल्यानंतर व आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर राज्य सरकारने स्थगिती दिली आहे. त्यामुळे आगामी सुधारीत आकृतीबंधात भौगोलीक क्षेत्रावर आधारीत सहायक कृषी अधिकारी व उपकृषी अधिकाऱ्यांची पदनिर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने मंजूर केलेला कृषी विभागाचा नवा आकृतीबंद रद्द करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषीसेवा महासंघ, महाराष्ट्र राज्य कृषी सेवा राजपत्रित अधिकारी संघटना, महाराष्ट्र कृषी सेवा वर्ग दोन राजपत्रित अधिकारी कल्याणकारी संघटना, महाराष्ट्र राज्य कृषी अधिकारी संघटना, महाराष्ट्र राज्य उप कृषी अधिकारी संघटना व महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटना या सहा संघटनांनी एल्गार पुकारला होता. येत्या ४ सप्टेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता.

नविन आकृतीबंधात क्षेत्रीय स्तरावर १५०० खातेदारांमागे एक सहायक कृषी अधिकारी अशी मान्यता देण्यात आली होती. याचा मोठा परिणाम विदर्भातील शेतीवर होणार आहे. उपकृषी अधिकाऱ्यांची पदे मुख्यालयात देण्यात आल्याने प्रत्यक्ष काम करणारी यंत्रणा कमी करून त्यांना कार्यालयीन काम देण्यात आले आहे. कृषी विभागाचा आकृतीबंध अतांत्रिक असून तो रद्द करावा तसेच तज्ज्ञ समिती गठीत करून शेतकरी केंद्रीत नवा आकृतीबंध तयार करावा, अशी मागणी या संघटनांनी केली आहे. संघटनांचा वाढता विरोध व आंदोलनाची भूमिका बघता नविन आकृतीबंधास स्थगिती देण्यात आली आहे. या आकृतीबंधात भौगोलीक क्षेत्रानुसार पद असा बदल करण्याचे नियोजन असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशासकीय गरज, भौगोलीक परिस्थिती, पेसा क्षेत्र तसेच वाढत्या योजनांचा आवाका लक्षात घेता सहाय्यक कृषी अधिकारी आणि उपकृषी अधिकारी पदे वाढविण्यासाठी अंतर्गत बदल करण्यात येणार आहेत, असे कृषी मंत्र्यांनी म्हटले असल्याचे सांगण्यात आले.

# नागपूर-शेगाव पायदळ वारीचे भारवाडीत -तिवसा येथे भक्तिभावात स्वागत

## माऊलीच्या जयघोषाने भारवाडी ते तिवसा परिसर दुमदुमला..

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२तिवसा :**
नागपूर येथून शेगावच्या दिशेने निघालेल्या पायदळ वारीचे शुक्रवारी, दि. २१ ऑगस्ट रोजी तिवसा तालुक्यातील भारवाडी येथे भक्तिभावात स्वागत करण्यात आले. दि. १८ ऑगस्ट रोजी नागपूर येथून सुमारे दोनशे वारकऱ्यांची शिस्तबद्ध दिंडी शेगावकडे मार्गस्थ झाली असून, दि. २७ ऑगस्ट रोजी ही वारी शेगाव येथे पोहोचणार आहे.नागपूर ते शेगाव या पायदळ प्रवासादरम्यान ठराविक ठिकाणी मुक्काम करीत वारकरी मोठ्या भक्तिभावाने, उत्साहाने आणि शिस्तीने मार्गक्रमण करीत आहेत. टाळ-मृदंगाचा गजर, अभंग-भजन आणि 'माऊली'च्या जयघोषामुळे वारीच्या मार्गावरील वातावरण भक्तिमय होत आहे.शुक्रवारी सकाळी वारीचे भारवाडी येथे आगमन झाले. यावेळी श्री संत सत्यदेव महाराज मंदिरात परमहंस सत्यदेव महाराज संस्थान तसेच मिलिंदभाऊ राऊत व सचिनभाऊ राऊत परिवाराच्या वतीने पालखीचे विधिवत पूजन करून वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली.स्वागत व पूजनानंतर दिंडी तिवसाकडे मार्गस्थ झाली. तिवसा येथे भुजाडे परिवाराच्या वतीने पालखीचे स्वागत करून वारी



पुढील प्रवासासाठी मार्गस्थ करण्यात आली. यावेळी वारकऱ्यांसह नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.दिंडीच्या आगमनामुळे भारवाडीपासून तिवसा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. 'माऊली-माऊली'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. भक्ती, श्रद्धा, शिस्त आणि सामाजिक एकोपा यांचा सुंदर संगम या पायदळ वारीत पाहायला मिळत असून, शेगावच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांचा हा भक्तिमय प्रवास परिसरातील नागरिकांसाठीही श्रद्धेचा आणि आनंदाचा अनुभव ठरत आहे.

# रक्षाबंधनानिमित्त उद्या रविवारी टपाल कार्यालय राहणार सुरु

## राखी मेल बुकिंगसाठी विशेष काऊंटर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती** राखी पर्वानिमित्त अमरावती टपाल विभागात विशेष उपक्रम राबविण्यात येत असून नागरिकांना राखी मेल बुकिंगची सुविधा अधिक सुलभ व्हावी यासाठी उद्या रविवार (ता.२३) विविध टपाल कार्यालयांमध्ये राखी मेल बुकिंगसाठी विशेष काउंटर कार्यरत राहणार आहे. या संधीचा अधिकाधिक फायदा घेण्याचे आवाहन अमरावती टपाल विभागाचे प्रवर डाक अधीक्षक पी. ए. गेडाम यांनी केले आहे. अमरावती व परतवाडा मुख्य डाकघर, अमरावती उप कॅम्प डाकघर, अचलपूर, बडनेरा, अंजनगाव, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, धामणगाव रेल्वे, धारणी, मोर्शी, व्हीएमव्ही, रुख्मिणीनगर, शिवाजीनगर, राजापेठ, वरुड, साईनगर, वलगाव व दर्यापूर उपडाकघर येथे या दिवशी राखी मेल बुकिंगसाठी विशेष काउंटर सुरू राहील. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा व आपल्या राखी वेळेत पोहोचण्यासाठी आगाऊ बुकिंग करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रक्षाबंधनाला राखी बांधण्याची योग्य वेळ कोणती ?

## सकाळी ६.२३ ते ९.४८ या वेळेत राखी बांधणं शुभ मानलं जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा सण मानला जातो. या दिवशी बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची आणि सुखी आयुष्याची प्रार्थना करते. तसंच भाऊही बहिणीचे आयुष्यभर रक्षण करण्याचं वचन देतो. त्यामुळे रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधण्यासाठी शुभ मुहूर्त कोणता, भद्राकाळ आहे का, याकडे अनेकांचं लक्ष असतं.

यंदा रक्षाबंधन २८ ऑगस्ट २०२६ रोजी साजरा केलं जाईल. पंचांगानुसार श्रावण पौर्णिमा तिथीची सुरुवात २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजून ८ मिनिटांनी होईल, तर पौर्णिमा तिथीची समाप्ती ही २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजून ४८ मिनिटांनी होईल. उदयतिथीनुसार रक्षाबंधन २८ ऑगस्टला साजरा केले जाईल.

रक्षाबंधनाच्या दिवशी भद्राकाळ असेल तर राखी बांधणं टाळावं, अशी धार्मिक मान्यता आहे. मात्र यंदा भांवडांना याची काळजी करण्याची गरज नाही. पंचांगानुसार भद्राकाळ २७



ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजून आठ मिनिटांपासून ते ९.३२ पर्यंत या कालावधीत असेल. म्हणजेच रक्षाबंधनाच्या दिवशी भद्राचे सावट राहणार नाही.

### राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त

ज्योतिषीय माहितीनुसार, २८ ऑगस्ट रोजी सकाळी ६.२३ ते ९.४८ या वेळेत राखी बांधणं शुभ मानलं जाणार आहे. हा मुहूर्त एकूण ३ तास २५ मिनिटांचा आहे. त्यामुळे शक्य असेल तर सकाळच्या वेळेतच भावाला राखी बांधण्याचा प्रयत्न करा. सकाळी शक्य नसेल तर दुपारच्या अभिजीत मुहूर्तातही राखी बांधता येऊ शकते.तसेच, यंदा रक्षाबंधनाच्या दिवशी चंद्रग्रहणही होणार असल्याचं नमूद करण्यात आलेलं आहे. मात्र हे ग्रहण भारतातून दिसणार नाही, त्यामुळे सूतक काळ लागू होणार नाही, अशी माहिती आहे.

# अमरावती विभागात ९३ टक्के खरिपाची पेरणी पूर्ण

# विभागात सोयाबीन,कपाशीलाच सर्वाधिक पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
पश्चिम विदर्भातील अमरावती महसूल विभागात चालू २०२६ च्या खरीप हंगामात आतापर्यंत सरासरीच्या ९३ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. विभागातील ३१ लाख ६० हजार ८८४ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी २९ लाख ५४ हजार ७३९ हेक्टरवर प्रत्यक्षात पेरणी झाली आहे. यंदाही शेतकऱ्यांनी नगदी पीक म्हणून सोयाबीन आणि कपाशीलाच पहिली पसंती दिली असून, पारंपरिक तृणधान्ये व कडधान्यांच्या क्षेत्रात मात्र मोठी घट नोंदवली गेली आहे.

कृषी विभागाच्या ताज्या अहवालानुसार, अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये पेरणीची सरासरी ९० टक्क्यांच्या पुढे गेली आहे.

यामध्ये बुलढाणा जिल्ह्यात ९७ टक्के (७ लाख १३ हजार ८१८ हेक्टर), अकोला ९१ टक्के (३ लाख ९४ हजार ९२९ हेक्टर), वाशीम ९३ टक्के (३ लाख ६९ हजार ८५६ हेक्टर), अमरावती ९३ टक्के (६ लाख ३८ हजार ३८१ हेक्टर) आणि यवतमाळ जिल्ह्यात ९२ टक्के (८ लाख ३७ हजार ७५४ हेक्टर) पेरणी पूर्ण झाली आहे.

विभागाच्या एकूण पेरणी क्षेत्रात सोयाबीन आणि कापूस या दोन मुख्यपिकांचा वाटा



सर्वाधिक राहिला आहे. विदर्भात सोयाबीनचे सरासरी क्षेत्र १४ लाख ६३ हजार ४११ हेक्टर असून, त्यापैकी १३ लाख ४७ हजार ००४ हेक्टरवर (९२ टक्के) प्रत्यक्ष पेरणी झाली आहे. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक ४ लाख ४४ हजार ४०१ हेक्टर (११२ टक्के) पेरणी झाली आहे. त्यापाठोपाठ वाशिममध्ये २ लाख ७१ हजार ०५० हेक्टर (९१ टक्के), यवतमाळमध्ये २लाख ४२ हजार २६८ हेक्टर (८६ टक्के), अमरावतीत २ लाख ०६ हजार ७२६ हेक्टर (८३ टक्के) आणि अकोल्यात १ लाख ८१ हजा ९९८ हेक्टरवर (७७ टक्के सोयाबीनचा पेरा झाला आहे.

विभागात कापसाचे सरासरी क्षेत्र १ लाख ९२ हजार ६१० हेक्टर असतान प्रत्यक्षात १० लाख ८२ हजार ९१ हेक्टरवर (९९ टक्के) लागवड झाव आहे. यवतमाळ जिल्ह्यात कापसाचेक्षेत्र सर्वाधिक असून, तिथे ४ लाख ८७ हजार ५११ हेक्टरवर (१०३ टक्के) लागवड झाली आहे. अमरावती जिल्ह्यात २ लाख ६८ हजार २९६ हेक्टर (१०० टक्के), अकोल्यात १ लाख ५५ हजार ०८७हेक्टर (१२१ टक्के), बुलढाण्यात १ लाख ३४ हजार १०२ हेक्टर (६८ टक्के) आणि वाशिममध्ये ३७ हजार ६५२ हेक्टरवर (१४२ टक्के) कापूस लागवड झाली आहे.

### ४,३१,३४५ हेक्टरवर तूर पेरणी

डाळवर्गीय पिकांमध्ये तुरीची पेरणी विभागात ४ लाख ३१ हजार ३४५ हेक्टरवर (९६ टक्के) झाली आहे. मात्र मुगाची पेरणी केवळ १६ टक्के (५ हजार ७७१ हेक्टर) आणि उडदाची पेरणी २० टक्के (६ हजार ३७० हेक्टर) क्षेत्रावरच आटोपली आहे. मजुरांची टंचाई, वन्यप्राण्यांचा उपद्रव, बदलते हवामान आणि हमीभावाची अनिश्चितता या कारणांमुळे शेतकरी तृणधान्य व इतर कडधान्यांऐवजी सोयाबीन-कपाशीकडे वळत असल्याचे चित्र या अहवालावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# सावकारीच्या पाशावर सहकार विभागाचा आसूड

## तीन दिवसांत ११ ठिकाणी धाडीशुक्रवारला अमरावती-२, चांदूर बाजार-३ आणि मोर्शीत १ कार्यवाही



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती :-** जिल्ह्यात अवैध सावकारी आणि बेकायदेशीर व्याजवसुलीविरुद्ध सहकार विभागाने धाडसत्र सुरू केले असून, सलग तीन दिवसांत अमरावती, तिवसा, बडनेरा, चांदूर बाजार, मोर्शी आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यांतील तब्बल ११ ठिकाणी झडती घेण्यात आली. या कारवाईत आतापर्यंत ११४ संशयास्पद दस्तऐवज जप्त करून चौकशीसाठी सील करण्यात आले आहेत. शुक्रवारी अमरावती शहर, चांदूर बाजार आणि मोर्शी येथे सहा ठिकाणी रात्री उशिरा पर्यंत कारवाई करण्यात आली.जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पथकांनी ही कारवाई केली. अमरावतीतील कठोरा रोडवरील देवी रेसिडेन्सीमधील दोन फ्लॅटमध्ये नवनीत रतनलाल चांडक यांच्या ठिकाणी झडती घेतली असता ३२ संशयास्पद दस्तऐवज आढळले. याच प्रकरणात गौरीनंदन प्रोव्हीजन्स या दुकानातून नाव नसलेला कोरा धनादेशही जप्त करण्यात आला.चांदूर बाजार येथील राजेश चांडक यांच्या निवास स्थानी झडती घेतली असता संशयास्पद कागदपत्रे आढळली नाहीत. तर जयस्तंभ चौकातील आनंद ट्रेडर्समध्ये कमलकिशोर सारडा यांच्या ठिकाणी नऊ कोरे स्टॅम्पपेपर आढळले. कैलास कमलकिशोर सारडा यांच्या हनुमान चौकातील निवासस्थानी नऊ दस्तऐवज जप्त करण्यात आले. यामध्ये स्थावर मालमत्तेचे खरेदीखत आणि नोंदवहीसह विविध कागदपत्रांचा समावेश आहे. मोर्शीतील घनश्याम गट्टाणी यांच्या निवासस्थानीही झडती घेण्यात आली; मात्र तेथे संशयास्पद कागदपत्रे आढळली नाहीत.यापूर्वी गुरुवारी बडनेरा परिसरातील चार ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या होत्या. त्यातील दोन ठिकाणांहून ४३ संशयास्पद दस्तऐवज जप्त करण्यात आले. यात इसारचिठ्ठ्या, कोरे खरेदीखत आणि शेतकऱ्यांचे सातबारा उतारे आदी कागदपत्रांचा समावेश आहे. बुधवारी तिवसा शहरातील शिवाजी चौकात केलेल्या कारवाईत ३९ संशयास्पद दस्तऐवजांसह कोरे धनादेश, स्वाक्षरी केलेले कोरे कागद, मुद्रांकित कोरे कागद, दोन दुचाकी आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र जप्त करण्यात आले.या तीन दिवसांच्या कारवाईत सहकार विभागाचे ४४ अधिकारी-कर्मचारी, २२ पोलिस कर्मचारी आणि २२ पंच सहभागी झाले. जप्त कागदपत्रांची पडताळणी सुरू असून, त्यातून अवैध सावकारीचे आणखी धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात कारवाईचा विस्तार होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# प्राथमिक शाळांच्या FSSAI नोंदणीसाठी मार्गदर्शनाची मागणी

## प्राथमिक शिक्षक समितीचे शासनाला निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाकडे नोंदणी व परवाना काढताना येणाऱ्या अडचणींबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे तातडीने मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

शाळांमध्ये सुरक्षित, पौष्टिक व संतुलित अन्न सुनिश्चित करण्यासाठी FSSAI नोंदणी व परवाना आवश्यक करण्यात आला आहे. मात्र, ग्रामीण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांना ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेत अनेक अडचणी येत असल्याचे शिक्षक समितीने निवेदनात नमूद केले आहे.

FOSCOS प्रणालीवर नोंदणी करताना शाळेच्या नावाने अर्ज करायचा की मुख्याध्यापक किंवा शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या नावाने अर्ज करायचा, याबाबत स्पष्ट सूचना नसल्याचे समितीचे म्हणणे आहे. तसेच नोंदणीसाठी झ-छ, आधार, भागभांडवल, शुल्क, आवश्यक कागदपत्रे तसेच नोंदणीनंतरच्या रेकॉर्ड व व्यवस्थापनाबाबतही शाळांना पुरेसे मार्गदर्शन मिळालेले नाही.काही शाळांमध्ये नियमित शिक्षक उपलब्ध नसणे, प्रभारी मुख्याध्यापकांची नियुक्ती असणे, तसेच मुख्याध्यापकांच्या बदली किंवा सेवानिवृत्तीमुळे वैयक्तिक नावाने काढलेल्या परवान्याचे पुढे काय करायचे, याबाबतही संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे जिल्हा व तालुका स्तरावर मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा घेऊन FSSAI नोंदणी व परवान्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी नेमकी कोणत्या प्रकारची ऋडड-ख नोंदणी आवश्यक आहे, याबाबत शासनाने स्पष्ट लेखी निर्देश जारी करावेत, अशीही शिक्षक समितीची मागणी आहे.




राज्याध्यक्ष विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शासनाच्या संबंधित विभागांकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली असून, शाळांना आवश्यक मार्गदर्शन न करता केवळ नोंदणी व परवान्यासाठी तगादा लावल्यास भविष्यात शाळांना प्रशासकीय अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# देशाला ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर करण्यासाठी अभियंत्यांनी योगदान द्यावे

## -महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### ४१व्या राष्ट्रीय विद्युत अभियांत्रिकी अधिवेशनात केले आवाहन

### ४० कोटीतून मेळघाटातील दुर्गम भागातील २२ गावांमध्ये वीज पोचली



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२२अमरावती-**
महाराष्ट्र व देशातील अभियंत्याची देशाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका राहिली आहे. आता २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी अभियंत्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले. अंधारात राहणाऱ्या मेळघाटातील आदिवासी दुर्गम भागात अभियंत्यांच्या मेहनतीमुळे वीज पोचली असून अंतिम २२ गावांमध्ये ४० कोटी निधीतून सोलर लाईन टाकण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

येथील अभियंता भवनात दि. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स अमरावती सेंटरच्या वतीने आयोजित '४१व्या राष्ट्रीय विद्युत अभियांत्रिकी अधिवेशनात' ते बोलत होते. आमदार प्रवीण पोटे आणि प्रवीण तायडे, दि. इन्स्टिटच्यूट ऑफ इंजिनियर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री .बावनकुळे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीत अभियंत्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्र व देशाच्या उर्जा क्षेत्र विकासातही अभियंत्यांनी महत्वाची भूमिका वठविली आहे. दीर्घकाळ अंधारात असलेल्या एलिफंटा येथील ऐतिहासिक घारापुरी लेण्यांमध्ये ७ किमीच्या समुद्रातून केबल प्लेट टाकून राज्य शासनाच्या महावितरण आणि पारेषण कंपन्यांच्या अभियंत्यांनी अभूतपूर्व कार्य केले आहे. याची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेत कौतुक असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर वाहिनी योजना प्रारंभिक अंमलबजवणी काळात अभियंत्यांच्या योगदानामुळे मिळालेल्या यशावर त्यांनी प्रकाश टाकला.

मेळघाटातील आदिवासी दुर्गम भागातील अंधारात राहणाऱ्या ३०० गांवामध्ये वीज पोचविण्यात अभियंत्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.यातील शेवटच्या २२ गावांमध्ये ४० कोटींच्या निधीतून सोलर लाईनच्या माध्यमातून वीज पोचविण्योच शिवधनुष्यही अभियंत्यांनी उचलल्याचे त्यांनी सांगितले. सौर पंपाद्वारे वीज उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्राने देशात अग्रस्थान मिळविले आहे व त्याची दखल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेतल्याचेही त्यांनी सांगितले. अभियंत्यांनी विकसित भारताचे लक्ष पूर्ण करण्यातही महत्वाचे योगदान द्यावे असेही ते म्हणाले.

विद्युत क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या हस्ते महाराष्ट्र वीज वितरण कंपनीचे संचालक राजेंद्र पवार, एनआयटी इटानगरचे (अरुणाचल प्रदेश) संचालक डॉ. मोहन आवारे आणि मराठवाड्यातील प्रसिद्ध उद्योजक प्रताप पवार या अभियंत्यांचा इमिनंट इंजिनियर पुरस्काराने तर डॉ एस. हेमवती, डॉ.एस.जयंती आणि प्रियम जैन या अभियंत्यांचा यंग इंजिनिअर पुरस्काराने गौरव करण्यात आला. तत्पूर्वी, श्री. बावनकुळे यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करून इंजिनियर फिटनेस सेंटरचे उद्घाटन झाले. दि. इन्स्टिटच्यूट ऑफ इंजिनियर्सचे संयोजक आनंद जवंजाळ यांनी प्रास्ताविक केले.

कृत्रिम बुद्धिमत्ता व हरित तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी देशात विद्युत निर्मितीचे उद्दिष्ट गाठण्याच्या उद्देशाने या दोन दिवसीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# अमरावती महापालिकेत करवाढीला विरोध

## मालमत्ता कराच्या नव्या दरानुसार वसुली तूर्तास लांबणीवर '

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती :**
राज्य शासनाने मालमत्ता कर पुनर्मूल्यांकनावरील स्थगिती उठवल्यानंतर अमरावती महापालिका प्रशासनाने नवीन वाढीव दरानुसार करवसुलीची तयारी चालवली होती. मात्र, नागरिकांवर अचानक आर्थिक बोजा लादण्याऐवजी सर्वपक्षीय नगरसेवकांनी या तडकाफडकी निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला. त्यामुळे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी निर्देश देत नवीन करवाढीनुसार वसुलीला तूर्तास स्थगिती दिली. याबाबत येत्या १५ दिवसांत विशेष सर्वसाधारणसभा बोलावून सविस्तर अहवाल सादर झाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रशासनाने करवाढीवरील स्थगिती उठवल्याचे पत्र पटलावर ठेवताच सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.



विधानसभा आणि महापालिका डोळ्यासमोर ठेवून सुरुवातीला दिशाभूल करणारी स्थगिती आणली गेली आणि निवडणुका संपताच ती उठवण्यात आल्याचा थेट आरोप काँग्रेसचे नगरसेवक बबलू शेखावत व युवा स्वाभिमान पक्षाचे प्रशांत वानखडे यांनी केला. यावरून त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना धारेवर धरले.महापालिकेचे १८५ कोटी रुपयांच्या मालमत्ता कराचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात केवळ ७८ कोटींचीच वसुली झाली आहे. प्रशासनाने आधी आहे त्या दराने १०० टक्के वसुली करून उत्पन्न वाढवावे, थेट दरवाढ कशासाठी, असा सवाल उपस्थित करण्यात आला. वाढीव दरांचा इतिहास तपासण्यासाठी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख आणि उपायुक्तांची एक समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती वर्ष १९८७, २००५ आणि २००८ मधील करवाढीच्या मूल्यांकनाचा सविस्तर अभ्यास करून १५ दिवसांत विशेष आमसभेत अहवाल सादर करेल.

(बॉक्स)सारासार विचार करूनच निर्णय व्हावा'शहराच्या विकासासाठी महापालिकेच्या तिजोरीत महसूल जमा होणे गरजेचे असले, तरी तडकाफडकी दरवाढ न करता सारासार विचार करूनच निर्णय व्हावा, अशी भूमिका भाजपचे गटनेते चेतन गावंडे, ॲड. प्रशांत देशपांडे, आशिष अतकरे तसेच राष्ट्रवादीचे गटनेते अविनाश मार्डीकर व भोजराज काळे यांनी मांडली. सभागृहातील तीव्र विरोध पाहता आयुक्तांनीही तूर्तास नवीन वाढीव दराने करवसुली केली जाणार नाही, अशी ग्वाही दिली असून पुढील धोरण विशेष सर्वसाधारण सभेतील निर्णयानंतरच स्पष्ट होणार आहे.

# दहीहंडीच्या उत्सवात भाजप-युवा स्वाभिमानची प्रतिष्ठा पणाला

## ६ सप्टेंबरला राजकमल-नवाथे चौकात गर्दी जमविण्याची कसोटी, राणा-पोटे गटाच्या ताकदीकडे जिल्ह्याचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
शहरातील यंदाची दहीहंडी केवळ उत्सव न राहता राजकीय शक्तिप्रदर्शनाचे मैदान ठरण्याची शक्यता आहे. आमदार रवी राणा आणि भाजपचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्यातील राजकीय मतभेद चर्चेत असतानाच, ६ सप्टेंबरला होणाऱ्या दोन दहीहंडी कार्यक्रमांमुळे या संघर्षाला नवे व्यासपीठ मिळण्याची शक्यता आहे.



युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने ६ सप्टेंबरला नवाथे चौकात विदर्भस्तरीय दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. दुसरीकडे भाजपच्या वतीने राजकमल चौकात दहीहंडी होणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे एकाच दिवशी शहरातील दोन प्रमुख चौकांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने ते प्रथम कोणत्या दहीहंडीला हजेरी लावणार, याबाबत उत्सुकता आहे. विधान परिषद निवडणुकीच्या काळात रवी राणा आणि प्रवीण पोटे पाटील यांच्यातील मतभेद कमी करण्याचे प्रयत्न झाले होते.

मात्र, निवडणुकीनंतर पुन्हा दोन्ही बाजूंकडून राजकीय ताकद दाखविण्याची तयारी सुरू झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे दहीहंडीच्या माध्यमातून गर्दी, आयोजन आणि राजकीय प्रभावाची अप्रत्यक्ष कसोटी लागण्याची शक्यता आहे.दोन प्रमुख ठिकाणी मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने वाहतूक नियंत्रण आणि कायदा-मुव्यवस्था राखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर राहणार आहे.

### कोण दाखविणार ताकद ?

दहीहंडीच्या निमित्ताने तरुणांचा उत्साह आणि जल्लोष अपेक्षित असताना त्याला राजकीय रंग किती चढतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. रवी राणा यांची गर्दी जमविण्याची ताकद आणि प्रवीण पोटे पाटील यांचे भाजपमधील संघटन यांची या निमित्ताने तुलना होणार आहे. त्यामुळे यंदाची दहीहंडी कोण फोडणार, यापेक्षा राजकीय ताकद कोण दाखवणार, याकडेच अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.-

# आश्रमशाळांच्या गैरव्यवस्थेविरोधात माकपचे धरणे

# राजेश बैठेकर मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष एसआयटी चौकशी करा

## कारवाई न झाल्यास जनआंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
चिखलदरा तालुक्यातील कारंजखेडा येथील आदिवासी विद्यार्थी राजेश बैठेकर यांच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष एसआयटी चौकशी करावी, तसेच धारणी व चिखलदरा तालुक्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील गैरव्यवस्थेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी माकपच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी तीव्र निदर्शने करून शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. तसेच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, धारणी व चिखलदरा या आदिवासीबहुल तालुक्यात १७ शासकीय आणि २७ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षण, आरोग्य वसर्वांगीण विकासासाठी शासनाकडून म ोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असतानाही आश्रमशाळांमधील मूलभूत प्रश्न कायम असल्याचा आरोप करण्यात आला.

उच्च शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाची सुविधा मिळावी म्हणून निवासी स्वरूपात महर्षी पब्लिक स्कूलची निवड करण्यात आली होती. मात्र, विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन, आरोग्य व शिक्षण व्यवस्थेबाबत सातत्याने तक्रारी होत असतानाही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप माकपने केला आहे.



निवेदनानुसार, १५ ऑगस्ट रोजी राजेश बैठेकर याच्यासह पाच विद्यार्थ्यांची अन्नविषबाधेमुळे प्रकृती बिघडली. गंभीर प्रकृती असतानाही तातडीने उपचार मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला.

राजेशची प्रकृती खालावल्यानंतर त्याला गावी पाठविण्यात आले आणि त्यानंतर त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय आश्रम शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे, भोजन व निवास व्यवस्था, मुलींची सुरक्षितता, जीर्ण इमारती, पाणी, वीज, स्वच्छतागृहे आदी मूलभूत सुविधांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र कृती दल स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली. क्रीडांगणे, खेळाचे साहित्य व प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली असून, कारवाई न झाल्यास व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा म किपच्या अमरावती जिल्हा कमिटीने दिला. यावेळी आंदोलनात पक्षाचे सुभाष पांडे, रमेश सोनुले आदी उपस्थित होते.-

# राणा दाम्पत्याच्या दहीहंडीची भाजपकडून कॉपी

## सोशल मीडियावर चर्चेला उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावतीत भाजपच्या वतीने यंदा भव्य 'गोविंदा आला रे' दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकारल्याचे वृत्त आहे. यापूर्वी रवी राणा यांच्या दहीहंडी कार्यक्रमाला फडणवीस उपस्थित राहिलेले आहेत




दरवर्षी राणा दाम्पत्याच्या वतीने मोठ्या उत्साहात दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते. मात्र, यंदा भारतीय जनता पक्षाच्या वतीनेही अमरावतीत भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन दहीहंडीचे निमंत्रण दिलं आहे. सोशल मीडियावर एका पोस्टची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.'राणा दाम्पत्याच्या दहीहंडीची भाजप कॉपी करणार का?'सोशल मीडियावरील पोस्टमध्ये यंदा भाजप कडून राखीला साड्या, आणि दिवाळीला किराणा किंवा इतर वस्तूंचे वाटप होणार का? असा उपरोधिक सवाल उपस्थित करण्यात आला आहेआता यंदा भाजपनेही स्वतंत्रपणे भव्य दहीहंडीचे आयोजन केल्याने अमरावतीच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.भाजपच्या दहीहंडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती राहणार असल्याने या कार्यक्रमाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पोस्टमधून भाजपच्या या आयोजनाची तुलना राणा दाम्पत्याच्या दहीहंडीशी करण्यात आली आहे. दहीहंडीची कॉपी; मग साड्या आणि किराणा वाटणार का असा सवाल पोस्टमधून उपस्थित करण्यात आला आहे.-

# बावनकुळेंचा विरोधकांवर हल्लाबोल; आश्रमशाळा-शाळा विषबाधा प्रकरणात कठोर कारवाईचे दिले संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती :**

भूतकाळातील मुद्दे उकरून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्यापेक्षा आत्मचिंतन करा, अशा शब्दांत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेवर जोरदार हल्लाबोल केला. शिळी भाकरी सकाळी खात नसतात. ज्या वेळी निर्णय घ्यायचा होता, त्यावेळी तुमचे हात लुळे-पांगळे होते का? असा सवालही त्यांनी विरोधकांना केला.मेळघाटातील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांमध्ये भूतबाधेची अफवा पसरल्याच्या मुद्द्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, आदिवासी विभागाकडून परिस्थितीवर काम सुरू असून विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भूतबाधेवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावित करणे योग्य नाही. ही अफवा कोणी पसरवली, याचाही तपास करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, अमरावतीतील महर्षी पब्लिक स्कूलमधील विषबाधा प्रकरणाची सरकारने गंभीर दखल घेतली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.



आदिवासी विभागाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू असून शाळेवर कोणती कारवाई करता येईल, याबाबत पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शाळेचा परवाना रद्द करण्यापासून नियमानुसार इतर कठोर कारवाईपर्यंतच्या पर्यायांवर मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.साखरेच्या वाढत्या दराबाबतही बावनकुळे यांनी केंद्र व राज्य सरकार दर नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.दरम्यान, तथ्य नसलेल्या मुद्द्यांना हवा देऊन जनतेत संभ्रम निर्माण करू नका, असा इशाराही बावनकुळे यांनी विरोधकांना दिला.

# डिसेंबरअखेर अमरावतीकरांची एक दिवसाआड पाणीपुरवठ्यातून मुक्तता; अमृत-२ योजनेला गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती :**

अमरावती शहराला वर्ष २०५५ पर्यंत मुबलक आणि नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ९८५.४९ कोटी रुपयांच्या अमृत-२ वाढीव पाणीपुरवठा योजनेला गती देण्याच्या दृष्टीने विविध शासकीय यंत्रणांची समन्वय



बैठक शुक्रवारी शासकीय विश्रामगृहात पार पडली. डिसेंबरअखेरपर्यंत प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करून अमरावतीकरांची एक दिवसाआड पाणीपुरवठ्यापासून मुक्तता करावी, अशा स्पष्ट सूचना आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाला दिल्या.सिंभोरा हेडवर्क्स ते नेर पिंगळाई संतुलित टाकीपर्यंत १४०० मिमी व्यासाची मृदू पोलादी समांतर ऊर्ध्ववाहिनी, तर पुढे अमरावती जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत १५०० मिमी व्यासाची गुरुत्ववाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. स्थापत्यविषयक कामे पूर्ण झाली असली तरी पाइपलाइन अंथरण्याच्या कामात विविध तांत्रिक अडथळे निर्माण झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.जागेचे हस्तांतरण, राष्ट्रीय महामार्गावरील खोदकामाची परवानगी, वन विभागाची एनओसी, महावितरणच्या विद्युत पोलचे स्थलांतर तसेच महापालिकेच्या ले-आऊटसंबंधी अडचणींमुळे काम प्रभावित होत असल्याचे मजीप्रा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या अडचणी दूर करण्यासाठी पाणीपुरवठा विभाग, वन विभाग, नगरविकास, महावितरण, एनएचएआय व एनएचपीडब्ल्यूडी या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना आमदार खोडके यांनी दिल्या.सिंभोरा येथे विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होत होता. ही समस्या दूर करण्यासाठी ३३ केव्ही विद्युत पुरवठा युनिट उभारण्यात आल्याची माहितीही बैठकीत देण्यात आली. अमृत-२ अंतर्गत शहरातील जलकुंभ व इतर पाणीपुरवठा कामांनाही गती देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

# पशुवैद्यकीय इमारत डॉक्टरांच्या प्रतीक्षेत

## लाखोंचा खर्च करून उभारलेली सुविधा वापराविना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चिखलदरा**

मेळघाटातील चुरणी येथे पशुपालकांच्या सुविधेसाठी श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखान्याची नवीन इमारत उभारण्यात आली आहे. मात्र, नियमित पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने ही इमारत वापराविना पडून आहे. लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या या इमारतीचा उपयोग नेमका कधी होणार, असा सवाल पशुपालकांकडून उपस्थित केला जात आहे. चुरणी परिसरात गाय, म्हैस यांसह मोठ्या प्रमाणात पशुधन आहे. पावसाळ्यात वातावरणातील बदलामुळे




जनावरांना विविध आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत पशुवैद्यकीय डॉक्टरांची नियमित सेवा आवश्यक असताना चुरणी येथे बराच काळ डॉक्टर उपलब्ध नसल्याने पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनावर आजारी पडल्यास उपचारासाठी त्यांना दूरवरच्या ठिकाणी जावे लागते. वेळेत उपचार न मिळाल्यास जनावरांची प्रकृती गंभीर होण्याची भीती असून, दुर्गम व आदिवासी भागातील पशुपालकांना आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. चुरणी येथे श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधण्यात आली आहे. मात्र, इमारत तयार असूनही नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने शासनाच्या निधीतून उभारलेली ही सुविधा प्रत्यक्षात पशुपालकांच्या सेवेत आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पशुधनाची नियमित तपासणी, लसीकरण, औषधोपचार तसेच आपत्कालीन पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होणे गरजेचे आहे. मात्र, डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे पशुपालक या मूलभूत सुविधांपासून वंचित राहत आहेत.

# जन्म-मृत्यूचा दाखलाही महाग, दहापट जास्त शुल्क लागणार !

## उशिरा नौदणीसाठी विलंब शुल्कातही झाली मोठी वाढ नियमावलीत सुधारणा, नवे दर लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

राज्य शासनाने सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणारा नवा निर्णय घेतला आहे. जन्म आणि मृत्यूच्या दाखल्यासाठी लागणाऱ्या शुल्कात तब्बल १० पट वाढ करण्यात आली आहे. आतापर्यंत अवघ्या २ रुपयांत मिळणाऱ्या दाखल्यासाठी नागरिकांना आता थेट २० रुपये मोजावे लागणार आहेत. राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी त्वरित सुरू करण्यात आली आहे.राज्य शासनाच्या महसूल




व वन विभागाने यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियमावलीत सुधारणा करून हे नवीन दर लागू करण्यात आले आहेत.

विलंब शुल्कातही झाली दरवाढ

२१ दिवसांनंतर नोंदणी केल्यास लागणाऱ्या विलंब शुल्कातही वाढ झाली आहे. १ महिन्यापर्यंत विलंब झाल्यास १० रुपये, तर १ वर्षापर्यंत विलंब झाल्यास ५० ते १०० रुपयांपर्यंत विलंब शुल्क आकारले जाईल.

शुल्कात कशामुळे दरवाढ ?

कागदपत्रांचा वाढता छपाई खर्च, डिजिटायझेशनचा खर्च आणि अनेक वर्षापासून न बदललेले जुने दर यामुळे शुल्कामध्ये ही दरवाढ करण्यात आल्याचे प्रशासकीय सूत्रांकडून सांगण्यात आले.

इतर शुल्कांसाठी जास्त पैसे

रजिस्टरमधील नोंद शोधणे, जुन्या नोंदींचे प्रमाणीकृत उतारे काढणे किंवा दाखल्यात दुरुस्ती करणे अशा इतर कामांसाठीही आता दुप्पट ते तिप्पट शुल्क द्यावे लागणार आहे.-

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल,अमरावतीत अस्वलाच्या हल्ल्यात गंभीर जखमी तरुणावर यशस्वी शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

धारणी येथील २८ वर्षीय तरुणावर अस्वलाच्या हल्ल्यात झालेल्या अत्यंत दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या डोके व चेहऱ्याच्या दुखापतीवर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.अस्वलाच्या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली होती. त्याच्या टाळूचा मोठा भागावर इजा झालेल्या होत्या,तसेच कवटीच्या पुढील व बाजूच्या भागाला गंभीर फ्रॅक्चर होऊन मेंदूचा काही भाग उघडा पडला होता. चेहऱ्याच्या हाडांनाही गंभीर दुखापत झाली होती.शस्त्रक्रियेदरम्यान जखमेची काळजीपूर्वक तपासणी करून ती पूर्णपणे स्वच्छ करण्यात आली. मृत ऊती काढून टाकण्यात आल्या. कवटीच्या फ्रॅक्चरची दुरुस्ती करून टाळूचा निखळलेला, मात्र जिवंत असलेला भाग जतन करण्यात आला.टाळूची पुनर्रचना



करण्यासाठी मागील बाजूस आधार असलेल्या स्कॅल्प फ्लॅप तंत्राचा वापर करण्यात आला. त्यामुळे कवटीचा उघडा भाग आणि दुराची दुरुस्ती झालेल्या जागेला तणावमुक्त व पुरेसा रक्तपुरवठा असलेले आवरण मिळाले. तसेच टाळूच्या मागील भागातील रक्तवाहिन्यांचा रक्तपुरवठा कायम राखण्यात आला. अस्वलाच्या हल्ल्यात झालेल्या अत्यंत दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या डोके व चेहऱ्याच्या दुखापतीवर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.मोठ्या प्रमाणातील ऊतींचे नुकसान, कवटीला झालेली उघडी इजा, मेंदूचा भाग उघडा पडणे आणि वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे संसर्गाचा वाढलेला धोका यामुळे हे प्रकरण वैद्यकीयदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक होते. मात्र, तज्ज्ञांच्या समन्वयातून शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.ही शस्त्रक्रिया आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली.अस्वलाच्या हल्ल्यात झालेल्या अत्यंत दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या डोके व चेहऱ्याच्या दुखापतीवर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक सर्जन डॉ. सागर भुतडा, न्यूरोसर्जन डॉ. डॉ. अभिजीत बेले, भूलतज्ज्ञ डॉ. दिपाली देशमुख,डॉ. अश्विनी मडावी , अधिसेविक चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर दिपाली देशमुख, मनीषा रामटेके, दीपिका वाठोडकर, राहुल वायझाडे, शुभम गवई, विजय गवई, अभिजित निचत , यश गवई, सुमित शिरसाट, राहुल कावनपुरे, नंदलाल राठोड, साकिब, ज्ञानेश लांजेवार यांचे शस्त्रक्रियेत महत्त्वपूर्ण योगदान होते.

# चिखलदऱ्यात पर्यटकांची दादागिरी: गाविलगड किल्ला पॉईंटवर शासकीय कामात अडथळा; गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चिखलदरा -**

निसर्गरम्य पर्यटन स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यातील गाविलगड किल्ला पॉईंटवर पर्यटकांकडून होणारी हुल्लडबाजी नेहमीच चर्चेचा विषय ठरते. मात्र, आता ही हुल्लडबाजी केवळ गोंधळापुरती मर्यादित न राहता थेट 'शासकीय कामात अडथळा' निर्माण करण्यापर्यंत पोहोचली आहे. या गंभीर प्रकारामुळे पोलिसांनी अखेर कठोर पावले उचलत संबंधित पर्यटकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० ते १.०० वाजण्याच्या सुमारास चिखलदरा पोलिसांना गाविलगढ किल्ला पॉईंटवर काही पर्यटक नियमांचे उल्लंघन करून वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त स्पीकर लावून मोठ्या आवाजात गाणी वाजवत असल्याची माहिती मिळाली. यावर तातडीने कार्यवाही करत पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले. तिथे त्यांना दोन चारचाकी वाहने आढळून आली.पोलीस पथकाने चालकांना वाहनातील ध्वनी प्रदूषण कमी करण्यास सांगितले असता, संतापलेल्या चालकांनी पोलिसांशीच हुज्जत घालण्यास सुरुवात केली. विशेष म्हणजे, आरोपींनी स्वतःची ओळख 'वंचित बहुजन पार्टी'चे कार्यकर्ते असल्याचे सांगून पोलिसांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. छेडछाडीच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत आरोपींनी पोलीस कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन केले. एवढेच नव्हे तर, एका पोलीस कर्मचाऱ्याची कॉलर पकडून धक्काबुक्की आणि शिवीगाळ करत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

पहिल्यांदाच कठोर कारवाई

चिखलदऱ्यात पर्यटकांकडून नियमांची पायमल्ली होण्याचे प्रकार नवीन नाहीत, मात्र या प्रकारानंतर पोलिसांनी कलम १३२, ३(५), ३५१(२) बीएनएस आणि मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सुगत दयाराम डोंगरे आणि विजय नरेंद्र डोंगरे (दोघेही रा. वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :